महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन)
नियम २०१९ अन्वये वेतननिश्चीतीचा
विकल्प सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, ३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.

क्र. संलेको-०२-२०१९/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/न.क्र.122 /७ वा वेतन आयोग/121
दिनांक 07 FEB 2019

संदर्भ: शासन वित्त विभाग अधिसूचना क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९.

## : परिपत्रक :

उपरोक्त संदर्भाधीन शासन अधिसुचनेनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१६ पासून सुधारीत वेतनसंरचना (वेतन मॅट्रिक्स) लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन )नियम २०१९ मधील नियम ६ (१) अनुसार सुधारीत वेतन संरचनेतील वेतनस्तरानुसार वेतननिश्चिती करण्याकरीता शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना या नियमांसोबत जोडलेल्या जोडपत्र तीन मधील नमुन्यात विकल्प व जोडपत्र चार मधील नमुन्यात बंधपत्र लेखी स्वरूपात देणेबाबत तरतुद आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेव गट-ब (राजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची सेवापुस्तके संचालनालयाच्या अभिरक्षेत असून ती संचालनालयाकडून अद्ययावत केली जातात.

यास्तव उपरोक्त प्रमाणे विकल्प व बंधपत्र हा विहीत नमुन्यात (Hard copy) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे प्रत्यक्ष तसेच adadmnzdat.mum-mh@gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावा. सदर विकल्प हा अधिसुचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत किंवा या नियमांत केलेल्या कोणत्याही सुधारणेमुळे विद्यमान वेतन संरचना सुधारण्यात आली असेल तेव्हा त्या प्रकरणी अशा सुधारणेच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पोहोचेल अशा बेताने पाठविण्यात यावा. विकल्प व बंधपत्राचा विहित नमुना यासोबत जोडला आहे.

(स्मिता कुलकर्णी)
सह संचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

Scanned by CamScanner

**(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर २०१९/प्र.क्र. १/सेवा-९ दिनांक ३० जानेवारी, २०१९ चे सहपत्र)**

## जोडपत्र तीन

विकल्पाचा नमुना

[पहा नियम ६ (१)]

१. (अ) कर्मचाऱ्याचे नांव * श्री/श्रीमती/कुमारी ........................................................

(ब) धारण केलेले पद ................................................ * कायम/स्थानापन्न

(क) विद्यमान वेतन सरंचना : वेतन बँड पीबी-**..... रुपये........... ग्रेड वेतन रुपये.........

(ड) सुधारित वेतन सरंचना: वेतन स्तर एस-*** ...... .. रुपये.........

(ई) कार्यालयाचे नाव ....................................................................................

२. मी * श्री/श्रीमती/कुमारी ............................................. ..................................

* (१) १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो/करते.

* (२) मी धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो / करते.

* माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.....

* माझे वेतन रुपये.................. पर्यंत वाढवणाऱ्या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत.

* मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही

दिनांक : नाव ......................................

---

### (केवळ कार्यालयाने भरावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की, * कायम / स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या * श्री /श्रीमती /कुमारी ............................................................................ यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही

दिनांक : नाव ......................................

कार्यालय प्रमुख .......................

*लागू नसेल ते खोडावे.

**वेतन बँड क्रमांक नमूद करावा.

***वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.

(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर वेपूर २०१९/प्र.क्र. १/सेवा-९
दिनांक ३० जानेवारी २०१९ चे सहपत्र)

जोडपत्र - चार
[पहा नियम ६ (२) (३)]

**वचन पत्र**

मी, ..................................................................... असे वचन देतो की, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील तरतूदींशी विसंगत वेतननिश्चितीच्या परिणामी किंवा पुढे वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून समायोजीत करून किंवा इतर प्रकारे शासनास परत करीन.

ठिकाण :
दिनांक :

सही
नाव ......................................
पदनाम..................................